**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग.**

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतच्या ई-निविदेतील कमी दराला प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ. कि.मि. इतके आहे. मनपा कार्यक्षेत्रामध्ये ३४८ कि.मी. इतक्या लांबीच्या वेगवेगळ्या व्यासाच्या जलवाहिन्या ३० ते ३५ वर्ष जुन्या आहेत. सदर जलवाहिन्यांच्या निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

मनपाच्या कार्यक्षेत्रात दररोज व्हॉल्व नादुरुस्तीच्या, पाईपलाईन लिकेज, नळाद्वारे येणारे घाण पाणी, पाईपलाईन चोकअप इत्यादी प्रकारच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते व पाणी पुरवठा सुरळीत ठेवावा लागतो. मनपा कार्यक्षेत्रामध्ये शांतीनगर, व-ळा जी.एस. आर, नारपोली जी.एस.आर., कामतघर, आझादनगर, एस.टी. स्टँण्ड ई.एस.आर, आय.जी.एम. ई.एस.आर., नागांव, नेहरु नगर, नवी वस्ती व कोंबडपाडा इत्यादी ठिकाणी झोन निहाय जलकुंभाद्वारे व बायपास जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा केला जातो. सदर झोन निहाय पाणी पुरवठा करणा-या व्हॉल्व पूर्णतः खराब झाल्यास किंवा बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्ती करणे किंवा आवश्यक असल्यास नविन व्हॉल्व बसविणे गरजेचे असते तसेच शहरातील मुख्य वितरण वाहिन्या नादुरुस्त होऊन गळती झालेस तातडीने जलवाहिनी दुरुस्तीकामी स्पेशल्स, व्हॉल्व, टी, रेडूसर, जीपी जॉईन्ट व इतर सुटे किरकोळ साहित्याची आवश्यकता भासते. तसेच गणमेटल, चेकनट, स्पींडलचे दर जिल्हा दरसुचीमध्ये उपलब्ध नसल्याने दरपत्रक मागवुन सदरचे दर बाजार भावाप्रमाण घेण्यात आलेले आहेत.

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. ९६,४४,७६३/- मात्रच्या रक्कमेतुन दि.०१/०६/२०२४ ते दि. ३०/११/२०२४ रोजी पर्यंत ६ महिन्यांच्या मुदतवाढीची रक्कम रु. ४८,३३,०८०/- मात्र रक्कम वजा करून ६ महिन्यांकरीता रु. ४८,११,६८३/- मात्र रक्कमेची ई-निविदा सुचना क्र. २५ दि. १३/०९/२०२४ ते २०/०९/२०२४ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व नवभारत, न्युज ब्रँन्ड या वृत्तपत्रात पसिध्द करण्यांत आली होती. दिनांक २३/०९/२०२४ रोजी ई-निविदा निविदा समिती समोर उघडली असता एकूण २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा मे बाबुलाल एस. पटेल याची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१० टक्के कमी दराची रक्कम रु. ४७,५८,७५४/- मात्रची प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबत.** | **रु. ४७,५८,७५४/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

**प्रशासकीय ठराव क्र.** ६४३ **दिनांक :-** ११/१० **/२०२४**

सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वातअसलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाकरीता साहित्य पुरविणे बाबतच्या कामाचे निविदाकार बाबुलाल एस. पटेल यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०० टक्के कमी दराने म्हणजेच रु. ४७,५८,७५४/- मात्र प्रमाणे असून या दरांना मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)

O/c **प्रशासक तथा आयुक्त**

**भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.**